# इब्रीयांस पत्र

१ जो देव मागील काळात, अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांद्वारे पूर्वजांशी बोलला, [२]तो ह्या शेवटच्या दिवसांत, पुत्राद्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याला त्याने सर्व गोष्टींत वारीस म्हणून नेमले आहे; त्याच्या द्वारे त्याने युगे निर्माण केली. [३]तो त्याच्या तेजाचे प्रतिबिंब व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून, आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने सर्व काही चालवीत आहे; त्याने पापांची शुद्धी केल्यावर तो वरील वैभवाच्या उजवीकडे बसला. [४]कारण त्याला वारशाने, देवदूतांहून अधिक श्रेष्ठ नाव मिळाल्यामुळे तो तितका त्यांच्याहून अधिक श्रेष्ठ केला गेला आहे.

[५]कारण, त्याने कोणत्या देवदूताला कधी म्हटले की, 'तू माझा पुत्र आहेस, मी आज तुला जन्म दिला आहे'; आणि पुन्हा, 'मी त्याला पिता होईन आणि तो मला पुत्र होईल'. [६]आणि शिवाय, तो ज्येष्ठ पुत्राला जगात आणतो तेव्हा असे म्हणतो की, 'देवाचे सर्व दूत त्याला नमन करोत'. [७]आणि देवदूतांविषयी तो म्हणतो की, 'तो आपल्या दूतांना वायू करतो आणि सेवकांना अग्नीच्या ज्वाला करतो.'

[८]पण पुत्राविषयी तो म्हणतो की,

'हे देवा, तुझे राजासन युगानुयुग आहे,
तुझ्या राज्याचा राजदंड
हा नीतीचा राजदंड आहे.
[९]तू नीतीवर प्रीती केलीस
व अनाचाराचा द्वेष केलास,
म्हणून देवाने, तुझ्या देवाने,
तुला तुझ्या सोबत्यांवर नेमून
हर्षाच्या तेलाचा अभिषेक केला आहे.'

[१०]आणि,

'हे प्रभू, तू प्रारंभी पृथ्वीचा पाया घातलास,
आणि आकाशे तुझ्या हातची कामे आहेत.
[११]ती नष्ट होतील, पण तू निरंतर आहेस.
ती सगळी वस्त्रासारखी जीर्ण होतील;
[१२]तू ती एखाद्या वस्त्रासारखी, अंगरख्यासारखी,
गुंडाळून ठेवशील, आणि ती बदलतील;
पण तू तोच आहेस,
आणि तुझी वर्षे लोपणार नाहीत.'

[१३]पण, 'मी तुझे वैरी हे तुझे पदासन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बस', असे त्याने कधी कोणत्या देवदूताला म्हटले आहे? [१४]ते सगळे तर, जे तारणाचे वारीस होणार आहेत त्यांची सेवा करण्यास पाठविलेले, सेवक आत्मे नाही काय?

२ ह्याकरता, आपण ऐकलेल्या गोष्टींकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे; नाहीतर आपण वाहवत जाऊ. [२]कारण असे की, देवदूतांद्वारे जे सांगितले होते ते वचन जर अढळ झाले आणि प्रत्येक उल्लंघनाला व आज्ञाभंगाला त्याचे यथान्याय प्रतिफळ मिळाले, [३]तर इतक्या मोठ्या तारणाकडे आपण दुर्लक्ष केल्यास कसे सुटू? प्रभूकडून प्रथम त्याची घोषणा सुरू होऊन ऐकणाऱ्यांनी आम्हाला त्याची खातरी पटवली; [४]देवानेही चिन्हे, अद्भुते व नाना प्रकारचे चमत्कार घडवून, तसेच आपल्या इच्छेप्रमाणे पवित्र आत्म्याच्या देणग्यांद्वारे त्यांच्या जोडीला साक्ष दिली. [५]कारण, आपण ज्याविषयी बोलतो ते येणारे जग त्याने देवदूतांच्या स्वाधीन ठेवले नाही. [६]पण एकाने एके ठिकाणी निक्षून साक्ष देऊन म्हटले आहे की,

'मानव तो काय की,
तू त्याची आठवण करतोस?
किंवा मानवपुत्र तो काय की,
तू त्याची भेट घेतोस?
[७]तू त्याला देवदूतांहून लवभर कमी केले आहे,
तू त्याला गौरव व मान
ह्यांनी मुकुटमंडित केले आहे;
[८]तू सर्व काही त्याच्या अधीन
- त्याच्या पायाखाली - ठेवले आहे.'

त्याने सर्व काही त्याच्या अधीन - त्याच्याखाली - ठेवले आहे म्हणजे त्याने त्याच्याखाली ठेवले नाही असे काही राहू दिले नाही; पण आता सर्व काही त्याच्याखाली ठेवले आहे असे आपण अजून पहात नाही.

[९]पण प्रत्येक मनुष्याकरता मरणाचा अनुभव
घेण्यासाठी देवाच्या कृपेने ज्याला देवदूतांहून लवभर कमी
केले होते, तो येशू मरणाच्या दुःखाद्वारे गौरव आणि मान
ह्यांनी मुकुटमंडित केलेला आपण पाहतो. [१०]कारण
ज्याच्यासाठी सर्व आहे, आणि ज्याच्या द्वारे सर्व झाले तो
पुष्कळ पुत्रांना गौरवाकडे आणीत असता, त्यांच्या
तारणाचा मार्ग काढणाऱ्यांस दुःखातून नेऊन पूर्ण करावे हे
त्याला उचित होते, [११]कारण जो पवित्र करतो व जे पवित्र
केले जातात ते सर्व एकापासून आहेत; आणि ह्या
कारणामुळे तो त्यांना बांधव म्हणायला लाजत नाही.
[१२]कारण असे म्हटले आहे की,

'बांधवांत मी तुझे नाव गाजवीन,
मंडळीत मी तुझे स्तोत्र गाईन.'

[१३]पुन्हा तो म्हणतो, 'मी तुझ्यावर भाव ठेवीन'; आणि,
पुन्हा असे की, 'बघा, मी आणि मला देवाने दिलेली मुले'.

[१४]म्हणून मुले जशी रक्तात व देहात भागीदार होतात
तसा तोही वाटेकरी झाला; म्हणजे त्याने मरणाचे बळ
ज्याच्यात आहे त्या सैतानाला मरणाद्वारे हतबल करावे.
[१५]आणि जे मरणाच्या भयामुळे सर्व आयुष्यभर स्वतः
दास्याच्या अधिकाराखाली राहिले त्यांना त्याने मुक्त
करावे.

[१६]कारण, त्याने, खरोखर देवदूतांना आवरले नाही,
पण अब्राहामाच्या संतानाला त्याने आवरले. [१७]म्हणून
त्याने सर्व बाबतींत, आपल्या बांधवांसारखे व्हावे हे
त्याला आवश्यक होते; म्हणजे लोकांच्या पापांबद्दल
प्रायश्चित्त करता येण्यास त्याला देवाविषयीच्या गोष्टींत
दयाळू आणि विश्वासू श्रेष्ठ याजक होता यावे. [१८]कारण
त्याची परीक्षा होऊन त्याने स्वतः सोसल्यामुळे तो ज्यांची
परीक्षा होते त्यांना साह्य करण्यास समर्थ आहे.

**३** म्हणून अहो पवित्र बंधू, स्वर्गीय पाचारणाचे
वाटेकरी, तुम्ही आपल्या विश्वासाचा प्रेषित व श्रेष्ठ
याजक जो ख्रिस्त येशू त्याच्याकडे लक्ष द्या. [२]जसा मोशे
त्याला ज्याने नेमले होते त्याच्या सगळ्या घरात विश्वासू
होता, तसा हाही ज्याने त्याला नेमले त्याच्याशी विश्वासू
होता. [३]कारण घर बांधणाऱ्याला घरापेक्षा अधिक मान
असतो, तसा हा मोशेपेक्षा अधिक मोठ्या गौरवास पात्र
गणलेला होता. [४]कारण प्रत्येक घर कोणी तरी बांधलेले
असते, पण सर्व बांधणारा देव आहे. [५]आणि, ज्या गोष्टी
पुढे सांगण्यात येणार होत्या त्या गोष्टींच्या साक्षीसाठी,
मोशे खरोखर, त्याच्या सगळ्या घरात सेवक म्हणून
विश्वासू होता; [६]पण ख्रिस्त हा तर, त्याच्या घरावर पुत्र
म्हणून विश्वासू होता. आपण जर आपले धैर्य, आणि
आपल्या आशेचा अभिमान शेवटपर्यंत बळकट धरू तर
आपण त्याचे घर आहो.

[७]म्हणून पवित्र आत्मा असे म्हणतो की,

'आज तुम्ही त्याचा आवाज ऐकाल,
[८]तर त्यांनी रानातल्या उठावणीत,
परीक्षेच्या दिवशी केल्याप्रमाणे,
तुम्ही आपली मने कठिण करू नका.
[९]तुमच्या पूर्वजांनी माझी परीक्षा केली,
आणि माझी पारख केली,
आणि चाळीस वर्षे माझी कामे बघितली.
[१०]मग मी त्या पिढीवर चिडून म्हणालो,
हे मनाने नेहमी बहकतात
आणि हे माझे मार्ग ओळखीत नाहीत.
[११]मी रागात शपथ घेऊन म्हटल्याप्रमाणे
ते माझ्या विसाव्यात येणार नाहीत.'

[१२]म्हणून बंधूंनो, तुम्ही अशी काळजी घ्या की,
जिवंत देवाला सोडण्याइतके अविश्वासाचे दुष्ट अंतःकरण
तुमच्यातील एखाद्यात असू नये. [१३]पण ज्याला 'आज'
म्हणण्यात आले तो आहे तोवर एकमेकांना बोध करा;
म्हणजे पापाच्या फसवेपणामुळे तुमच्यातील कोणी कठिण
होऊ नये. [१४]कारण, आपण आपला प्रारंभीचा भाव
शेवटपर्यंत बळकट धरला तर आपण ख्रिस्ताचे वाटेकरी
झालो आहोत. [१५]आपल्यासाठी हे म्हटले आहे की, 'आज
तुम्ही त्याचा आवाज ऐकाल, तर त्यांनी उठावणीत
केल्याप्रमाणे तुम्ही आपली मने कठिण करू नका.'

[१६]कारण, कोणी ऐकूनही चिरडीस आणले? मोशेमुळे
जे मिसरातून निघाले त्या सर्वांनीच नव्हे काय? [१७]चाळीस
वर्षे तो कोणावर चिडला होता? ज्यांनी पाप केले होते व
ज्यांची प्रेते अरण्यात पडली त्यांच्यावर नव्हे काय?
[१८]आणि 'ते माझ्या विसाव्यात येणार नाहीत', हे त्याने
कोणाला शपथ घेऊन म्हटले? ज्यांनी अवमान केला होता
त्यांना नव्हे काय?

[१९]ह्यावरून आपण हे पाहतो की, ते त्यांच्या
अविश्वासामुळे प्रवेश करू शकले नाहीत.

**४** **आणि ह्यावरून,** त्याच्या विसाव्यात जाण्याचे
वचन आपल्यासाठी राहिले असता, तुमच्यामधला
कोणी त्याला दुरावलेला दिसू नये म्हणून आपण भय धरले
पाहिजे. [२]कारण, त्यांना सुवार्ता सांगण्यात आली तशीच
आपल्याला सांगण्यात आली, पण, त्यांनी ऐकलेले वचन
त्यांच्या विश्वासात न मुरल्यामुळे त्यांना त्याचा लाभ
झाला नाही. [३]कारण जगाच्या स्थापनेपासून कामे पूर्ण
झाली होती तरी तो म्हणतो, 'मी रागात शपथ घेऊन
म्हटल्याप्रमाणे ते माझ्या विसाव्यात येणार नाहीत'.
म्हणजे त्याच्या म्हणण्याप्रमाणे ज्यांनी विश्वास ठेवला
आहे ते आपण त्या विसाव्यात जाणार आहोत. [४]कारण
सातव्या दिवसाविषयी तो एके ठिकाणी असे म्हणतो,
'आणि देवाने सातव्या दिवशी आपल्या सर्व कामांपासून
विसावा घेतला'. [५]आणि येथे पुन्हा म्हणतो, 'ते माझ्या
विसाव्यात येणार नाहीत'.

[६]म्हणजे कित्येक त्यात जाणार आहेत हे राहिले आहे
व ज्यांना प्रथम त्याची सुवार्ता सांगण्यात आली ते
अवज्ञेमुळे आत गेले नाहीत; [७]म्हणून, तो एक दिवस
ठरवतो व दाविदाच्या मुखावाटे इतक्या दीर्घ काळानंतर
तो 'आज' म्हणतो. कारण असे म्हटले आहे की, 'आज
तुम्ही त्याचा आवाज ऐकाल तर तुम्ही आपली मने कठिण
करू नका', [८]कारण यहोशवाने त्यांना विसावा दिला
असता तर देव त्यानंतर दुसऱ्या दिवसाविषयी बोलला
नसता.

[९]म्हणजे देवाच्या लोकांकरता शब्बाथाचा विसावा
अजून राहिला आहे. [१०]कारण, देवाने आपल्या
कामांपासून ज्याप्रमाणे विसावा घेतला, त्याप्रमाणे त्याच्या
विसाव्यात जाणाराही आपल्या कामांपासून विसावा घेतो.

[११]म्हणून त्या विसाव्यात जाण्यास आपण झटू या;
म्हणजे कोणी त्या आज्ञाभंगाच्या उदाहरणाप्रमाणे पडू नये.

[१२]**कारण देवाचे वचन** जिवंत व परिणामकारक
आहे; कोणत्याही दुधारी तरवारीहून ते धारदार असून जीव
व आत्मा, संधी व मज्जा हे अलग करून ते पार जाते;
आणि मनातील विचार व हेतू ते पारखते. [१३]आणि
कोणतीही निर्मिती त्याच्या दृष्टीला अदृश्य नाही; तर
ज्याच्यापुढे आपला हिशोब आहे त्याच्या डोळ्यांपुढे सर्व
गोष्टी उघड्या व उघड केलेल्या आहेत.

[१४]**म्हणून देवाचा पुत्र येशू** हा आकाशांतून पार
गेलेला, असा महान, श्रेष्ठ याजक आपल्याला आहे, तर
आपण केलेला पतकर आपण बळकट धरू या. [१५]कारण
आपल्या अशक्तपणात जो सहानुभवी होऊ शकत नाही
असा श्रेष्ठ याजक आपल्याला नाही, पण ज्याची
आपल्याप्रमाणे सर्व बाबतींत परीक्षा झाली, आणि तरी जो
निष्पाप राहिला, असा श्रेष्ठ याजक आपल्याला आहे.
[१६]तर आपल्याला दया मिळावी आणि आपल्या गरजेच्या
वेळी साह्यासाठी कृपा मिळावी म्हणून आपण कृपेच्या
राजासनापुढे धैर्याने जाऊ या.

**५** **कारण लोकांतून निवडलेला,** प्रत्येक श्रेष्ठ
याजक लोकांकरता देवाच्या गोष्टींवर नेमलेला
असतो; म्हणजे त्याने पापांबद्दल अर्पणे व बलिदाने अर्पण
करावीत. [२]आणि स्वतः तोही अशक्तपणाच्या वेढ्यात
असल्यामुळे, जे लोक अज्ञानी व चुकणारे आहेत
त्यांच्याविषयी त्याला सहानुभूती दाखविता येईल. [३]म्हणून
त्याला लोकांसाठी, तसेच आपल्या स्वतःसाठी पापांबद्दल
अर्पण करणे आवश्यक होते.

[४]आणि हा मान कोणी स्वतःला घेत नाही, पण तो
अहरोनाप्रमाणे देवाने बोलावलेला असतो. [५]त्याप्रमाणे
ख्रिस्तानेही श्रेष्ठ याजक होण्यासाठी स्वतःचे गौरव केले
नाही; पण 'तू माझा पुत्र आहेस, आज मी तुला जन्म दिला
आहे', असे ज्याने त्याला म्हटले त्याने त्याला गौरवले
आहे. [६]कारण दुसरीकडे तो म्हणतो की,
'मलकीसेदेकाच्या प्रकारचा तू सनातन याजक आहेस'.

[७]तो देही झाला त्या दिवसांत, जो त्याला मरणातून
वाचवायला समर्थ होता, त्याला त्याने मोठ्याने आक्रोश
करीत व अश्रू गाळीत प्रार्थना आणि विनवण्या सादर
केल्या, आणि त्याने सद्भय धरल्यामुळे त्याचे ऐकले गेले;
[८]आणि पुत्र होता तरी, त्याने सोसलेल्या गोष्टींकडून तो
आज्ञापालन करणे शिकला, [९]आणि पूर्ण केला गेल्यामुळे
जे कोणी त्याच्या आज्ञा पाळतात त्या सर्वांसाठी तो
सार्वकालिक तारणाचा कर्ता झाला आहे; [१०]तो देवाच्या
वचनाप्रमाणे मलकीसेदेकाच्या प्रकारचा श्रेष्ठ याजक झाला
आहे.

[११]**ह्या बाबतीत सांगण्यासाठी** पुष्कळ गोष्टी
आमच्याजवळ आहेत पण त्या समजावण्यास कठिण

आहेत; कारण तुम्ही ऐकण्यात मंद झाला आहा.
१२कारण, तुम्ही एव्हाना शिक्षक व्हावे असा काळ आला
असता देवाच्या वचनांची प्राथमिक मूलतत्त्वे तुम्हाला
कोणी पुन्हा शिकवावीत अशी तुमची गरज आहे व तुम्ही
असे झाला आहात की, तुम्हाला दुधाची गरज आहे;
आणि जड अन्नाची गरज नाही. १३कारण, जो दुधाचा
वाटेकरी असतो तो नीतीच्या वचनात अज्ञान असतो;
कारण तो बाळ आहे. १४पण ज्यांनी आपल्या ज्ञानेंद्रियांना,
तशा सवयीने, बरेवाईट ओळखण्याचे शिक्षण दिले आहे,
अशा प्रौढांसाठी जड अन्न आहे.

## ६

**म्हणून** आपण ख्रिस्ताविषयीच्या शिकवणीच्या,
प्राथमिक गोष्टी मागे ठेवून पूर्ण करणाऱ्या गोष्टींकडे
पुढे जाऊ या. त्याच गोष्टींच्या शिकवणीचा पाया पुन्हा
पुन्हा घालू नये; निर्जीव कामांविषयी पश्चात्ताप आणि
देवावर विश्वास, २बाप्तिस्म्याविषयी शिकवण व
डोक्यावर हात ठेवणे, मृतांचे पुनरुत्थान आणि
सार्वकालिक न्यायनिवाडा ह्या त्या गोष्टी आहेत. ३आणि
हे देवाने करू दिले तर आपण करू. ४कारण हे की, ज्यांना
एकदा प्रकाश मिळाला आणि ज्यांनी स्वर्गीय दानाचा
अनुभव घेतला आहे, जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले,
५आणि ज्यांनी देवाच्या सुवचनाची व येणाऱ्या युगांच्या
सामर्थ्यांची रुची घेतली आहे, ६ते स्वतः जर पतित झाले
तर त्यांचे पुन्हा, पश्चात्तापासाठी नवीकरण करणे अशक्य
आहे; कारण ते देवाच्या पुत्राला आपल्या स्वतःसाठी
पुन्हा वधस्तंभावर खिळतात व त्याचा उघड अपमान
करतात. ७कारण जी जमीन वारंवार येणारा पाऊस पिते व
तिची मशागत करणाऱ्यांना जी उपयोगी पिके देते ती
देवाचा आशीर्वाद घेते. ८पण जी काटेकिंकर उपजवते ती
नापसंत होऊन शाप घेईल; ती जाळली जावी हा तिचा
शेवट आहे.

९पण प्रियांनो, आम्ही जरी हे म्हटले आहे तरी
आम्हाला अधिक चांगल्या गोष्टींविषयी व तारणाबरोबर
येणाऱ्या गोष्टींविषयी तुमच्या बाबतीत खातरी आहे.
१०कारण देव तुमचे काम आणि, तुम्ही करीत आहा तशी,
पवित्र जनांची सेवा करण्यात तुम्ही त्याच्या नावाकरता
दाखविलेली प्रीती विसरून जाण्यास अन्यायी नाही.
११आणि आमची अशी इच्छा आहे की, तुमच्यामधील
प्रत्येकाने आशेच्या पूर्ण खातरीसाठी शेवटपर्यंत अशीच
आस्था दाखवावी. १२म्हणजे तुम्ही आळशी होऊ नये,
पण विश्वास व धीर हा मार्ग पतकरून जे वचनाचा वारसा
घेत आहेत त्यांचे अनुकरण करणारे व्हावे.

१३**कारण देवाने अब्राहामाला** वचन दिले, तेव्हा
त्याला आपल्याहून मोठ्याची शपथ घेणे शक्य
नसल्यामुळे त्याने स्वतःची शपथ घेतली; १४आणि त्याला
म्हटले की, 'खरोखर, मी तुला आशीर्वाद देऊन आशीर्वाद
देईन, आणि बहुगुणित करून बहुगुणित करीन.' १५आणि
त्याने धीर धरल्यावर त्याला ते वचन प्राप्त झाले.

१६आणि लोक, खरोखर, आपल्याहून मोठ्याची
शपथ घेतात व ते आपल्या समर्थनासाठी, शपथ घेऊन
वादाचा शेवट करतात. १७आणि, तशीच देवाची इच्छा
असल्यामुळे त्याने आपल्या योजनेची अचलता
वचनाच्या वारसांना स्पष्टपणे दाखविण्यास स्वतः मध्यस्थ
होऊन शपथ घेतली. १८म्हणजे, ज्यात देवाला खोटे
बोलणे अशक्य होते अशा दोन अचल गोष्टींच्या योगे,
आपण जे आश्रयासाठी धावलोत त्या आपल्यापुढे
ठेवलेली आशा आपण हस्तगत करावी म्हणून,
आपल्याला सबळ उत्तेजन मिळावे. १९ही आशा आपल्या
जिवांचा नांगर आहे; तो स्थिर व अढळ असून
पडद्यापलीकडे आत जातो. २०तेथे आपल्याकरता पुढे
धावणारा येशू आत गेला असून, मलकीसेदेकाच्या
प्रकारचा सनातन श्रेष्ठ याजक झाला आहे.

## ७

**कारण हा मलकीसेदेक** शालेमाचा राजा
असून परात्पर देवाचा याजक होता; आणि
अब्राहाम राजांना मारून परतला तेव्हा त्याला भेटून ह्याने
त्याला आशीर्वाद दिला; २आणि त्याला अब्राहामाने
सगळ्या लुटीचा दशमांश दिला. तो प्रथमतः, त्याच्या
नावाच्या अर्थाप्रमाणे, नीतिमत्वाचा राजा होता व तो
शिवाय, शालेमाचा म्हणजे शांतीचा राजा होता. ३बाप
नाही, आई नाही, वंशावळ नाही, त्याच्या दिवसांचा प्रारंभ
नाही किंवा जीवनाचा अंत नाही; पण देवाच्या पुत्रासारखा
केला गेल्यामुळे तो निरंतर याजक राहतो.

४तर आता, कुलपिता अब्राहाम ह्याने ज्याला उत्तम
लुटीचा दशमांश दिला तो हा मनुष्य किती मोठा होता
ह्याचा विचार करा. ५आणि लेवीच्या वंशजांतील ज्यांना
याजकपण मिळत असते त्यांना लोकांकडून, म्हणजे

अब्राहामाच्या पोटच्या, आपल्या स्वतःच्या बांधवांकडून, नियमशास्त्रानुसार दशमांश घेण्याची आज्ञा आहे. ६पण जो त्यांच्या कुळातला नव्हता त्याने अब्राहामाकडून दशमांश घेतला; आणि ज्याला वचने मिळाली होती त्याला त्याने आशीर्वाद दिला. ७आणि हे निर्विवाद आहे की, मोठ्याकडून लहानास आशीर्वाद दिला जातो. ८आणि येथे, मरणारे लोक दशमांश घेतात, पण तेथे घेणारा असा आहे की, 'तो जिवंत आहे' अशी त्याच्याविषयी साक्ष दिली गेली आहे. ९आणि असे म्हणता येईल की, दशमांश घेणाऱ्या लेवीनेही अब्राहामाद्वारे दशमांश दिला. १०कारण, त्याच्या बापाला मलकीसेदेक भेटला तेव्हा तो त्याच्या पोटी होता.

११**म्हणून लेवीय याजकपणाने** जर पूर्णता झाली असती, (कारण त्याखालीच लोकांना नियमशास्त्र दिले गेले) तर मग अहरोनाच्या प्रकारचा कोणी बोलावण्यात न येता, मलकीसेदेकाच्या प्रकारचा आता दुसरा याजक व्हावा ह्याचे आणखी अगत्य काय होते? १२कारण याजकपण बदलले म्हणून, आवश्यकतेने, नियमशास्त्राचा बदलही आला. १३ कारण ज्याच्याविषयी हे म्हटले आहे तो, ज्या वंशातील, कोणी मनुष्याने वेदीची काळजी घेतलेली नाही अशा दुसऱ्या वंशातील वाटेकरी आहे. १४कारण आपला प्रभू यहुदाच्या वंशात जन्मास आला हे आधीपासून उघड आहे; आणि याजकांबद्दल त्या वंशाविषयी मोशे काही म्हणाला नाही.

१५आणि तरी हे अधिक स्पष्ट आहे; कारण मलकीसेदेकासारखा दुसरा आला आहे. १६तो दैहिक आज्ञेच्या नियमशास्त्रानुसार केलेला नाही, पण अव्यय जीवनाच्या सामर्थ्याने केला गेला आहे. १७कारण तो अशी साक्ष देतो की, 'मलकीसेदेकाच्या प्रकारचा तू सनातन याजक आहेस.'

१८कारण, प्रथम आलेली आज्ञा दुर्बळ आणि निरुपयोगी म्हणून, खरोखर, रद्द करण्यात आली. १९कारण, नियमशास्त्राने काही पूर्ण केले नाही, पण अधिक चांगल्या आशेच्या आगमनाने केले आहे. तिच्या द्वारे आपण देवाजवळ जातो. २०आणि ज्याअर्थी हे शपथेशिवाय झाले नाही, (२१कारण, ते याजक शपथेशिवाय केले गेले, पण 'परमेश्वराने शपथ घेतली आहे, ती तो बदलणार नाही, तू सनातन याजक आहेस' असे ज्याला त्याने म्हटले तो हा त्याच्या शपथेने झाला.) २२त्याअर्थी येशू अधिक चांगल्या कराराचा जामीन झाला. २३आणि, खरोखर, ते याजक पुष्कळ झाले; कारण मरणाने त्यांना राहू दिले नाही. २४पण हा निरंतर राहणार आहे म्हणून ह्याचे याजकपण अबाधित आहे. २५म्हणून जे त्याच्या द्वारे देवाकडे जातात त्यांना शेवटपर्यंत तारण्यासदेखील तो समर्थ आहे. कारण त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यास तो सर्वकाळ जिवंत आहे. २६कारण अशा प्रकारचा पवित्र, निष्कपट, अदूषित, पाप्यांहून वेगळा व स्वर्गांहून उंच केला गेला आहे असा श्रेष्ठ याजक आपल्याला असणे उचित होते. २७त्याला दररोज, त्या श्रेष्ठ याजकांप्रमाणे, प्रथम स्वतःच्या व नंतर लोकांच्या पापांबद्दल बलिदान अर्पावे लागत नाही. कारण त्याने स्वतःचे अर्पण केले तेव्हा त्याने हे एकदाच केले.

२८कारण नियमशास्त्र हे अशक्तपणाने भरलेल्या मनुष्यांना श्रेष्ठ याजक म्हणून नेमते; पण नियमशास्त्राच्या मागून आलेले शपथेचे वचन सर्वकाळासाठी पूर्ण केलेल्या पुत्राला नेमते.

८ **आम्ही जे काही म्हटले आहे** त्याचे आता हे सार आहे की, असा श्रेष्ठ याजक आपल्याला आहे; तो स्वर्गातील, राजवैभवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे; २आणि माणसांनी नव्हे, पण परमेश्वराने उभारलेल्या पवित्र स्थानाचा व खऱ्या मंडपाचा सेवक झाला आहे. ३कारण प्रत्येक श्रेष्ठ याजक अर्पणे व बलिदाने सादर करण्यास नेमलेला असतो; तेव्हा तसेच सादर करण्यास ह्याच्याजवळही काही असावे हे आवश्यक आहे.

४कारण तो पृथ्वीवर असता, तर तो याजक झाला नसता; कारण असे याजक, नियमशास्त्रानुसार, अर्पणे सादर करीत आहेत. ५ते ज्या गोष्टींची सेवा करतात त्या स्वर्गीय गोष्टींच्या प्रतिकृती व छाया आहेत; कारण, मोशे मंडप करणार होता तेव्हा त्याला तशा अर्थाची सूचना देण्यात आली होती. कारण त्याला तो म्हणतो की, 'पहा, तुला डोंगरावर दाखविलेल्या नमुन्याप्रमाणे तू सर्व गोष्टी कर.' ६पण ह्याला अधिक चांगली सेवा मिळाली आहे, कारण हा अधिक चांगल्या वचनांवर आधारलेल्या, अधिक चांगल्या कराराचा मध्यस्थ आहे. ७कारण पहिला करार जर निर्दोष असता तर दुसऱ्यासाठी जागा शोधली गेली नसती.

[८]कारण तो त्यांना दोष देऊन म्हणतो की,
'परमेश्वर म्हणतो,
बघा, असे दिवस येत आहेत की,
इस्राएलाच्या घराण्याबरोबर,
आणि यहुदाच्या घराण्याबरोबर,
मी त्या दिवसांत नवा करार करीन;
[९]मी त्यांच्या पूर्वजांना
मिसर देशातून बाहेर नेण्यास
माझ्या हाताने धरले त्या दिवशी
मी त्यांच्याबरोबर करार केला
तसा करणार नाही.
कारण ते माझ्या करारात राहिले नाहीत,
आणि मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले,
असे परमेश्वर म्हणतो.
[१०]कारण त्या दिवसांनंतर
इस्राएलाच्या घराण्याबरोबर
मी असा करार करीन,
असे परमेश्वर म्हणतो.
मी त्यांच्या मनांत माझे नियम घालीन,
आणि ते त्यांच्या अंतःकरणांवर लिहीन.
मी त्यांचा देव होईन
आणि ते माझी प्रजा होतील.
[११]तेव्हा ते, प्रत्येक जण आपल्या गावकऱ्याला,
आणि प्रत्येक जण आपल्या बंधूला,
असे शिकवणार नाहीत,
आणि सांगणार नाहीत की,
तुम्ही परमेश्वराला ओळखा,
[१२]कारण मी त्यांच्या अपराधांची गय करीन,
आणि त्यांची पापे पुन्हा स्मरणार नाही.'
[१३]ह्यात तो 'नवा' म्हणतो, म्हणजे पहिला त्याने जुना
ठरवला, आणि जे जुने झाले व जीर्ण होत आहे ते रद्द
होण्याच्या लागास आले आहे.

९ तेव्हा पहिल्या करारातदेखील उपासनेचे
नियम होते व पृथ्वीवरील पवित्र स्थान होते. [२]कारण
एक मंडप केलेला होता; तो पहिला होता. त्यात दीपवृक्ष
व मेज असून त्यावर समर्पणाच्या भाकरी ठेवीत. त्याला
पवित्र स्थान म्हटले आहे. [३]आणि दुसऱ्या पडद्यामागे
परमपवित्र स्थान म्हटलेला मंडप होता. [४]तेथे सोन्याचे
धुपाटणे होते व सगळीकडून सोन्याने मढविलेला,
कराराचा कोश होता. त्यात मान्ना ठेवलेली सोन्याची
वाटी, कळ्या आलेली अहरोनाची काठी व कराराच्या
पाट्या होत्या. [५]आणि वरील दयासनावर छाया करणारे
गौरवी करूबिम त्यावर होते; येथे आपल्याला ह्या
गोष्टींविषयी सविस्तर बोलता येत नाही.

[६]आणि ह्या गोष्टी जेव्हा अशा केल्या गेल्या
तेव्हापासून पहिल्या मंडपात, पवित्र सेवा करण्यासाठी
याजक सतत जात आहेत. [७]पण केवळ श्रेष्ठ याजक
दुसऱ्यात वर्षातून एकदा जातो, आणि जे रक्त स्वतःसाठी
व लोकांकडून अज्ञानामुळे केल्या गेलेल्या पापांबद्दल तो
अर्पण करतो, ते घेतल्याशिवाय तो आत जात नाही.
[८]ह्यात पवित्र आत्मा दाखवितो की, पहिला मंडप उभा
असेपर्यंत परमपवित्र स्थानाचा मार्ग प्रकट केला गेला
नव्हता. [९]तो आताच्या काळासाठी दाखला आहे. तेथे
अर्पीत ती दाने व बलिदाने, ती सेवा करणाऱ्याला,
विवेकदृष्ट्या, पूर्ण करू शकत नव्हती. [१०]त्यांचा केवळ
खाण्यापिण्याशी व अनेक प्रकारच्या प्रक्षालनांशी संबंध
होता; त्यांत सुधारणेच्या काळापर्यंत त्यांना लावलेले
दैहिक नियम होते.

[११]**पण ख्रिस्त** येणाऱ्या चांगल्या गोष्टींचा श्रेष्ठ याजक
झाल्यामुळे, अधिक मोठ्या, अधिक परिपूर्ण व कोणी
हातांनी न केलेल्या, म्हणजे ह्या सृष्टीतील नाही अशा
मंडपाद्वारे, [१२]बकऱ्यांचे व गोऱ्ह्यांचे रक्त घेऊन नाही, पण
आपल्या स्वतःचे रक्त घेऊन एकदाच पवित्र स्थानात
गेला; आणि, त्याने आपल्यासाठी सार्वकालिक मुक्ती
मिळवली. [१३]कारण, बकऱ्यांचे किंवा बैलांचे रक्त, किंवा
कालवडीची राख, शिंपडल्याने, जर देहाची शुद्धी करते
आणि विटाळलेल्यांना शुद्ध करते, [१४]तर, सनातन
आत्म्याद्वारे ज्याने देवाला आपल्या स्वतःला निष्कलंक
असे अर्पण केले, त्या ख्रिस्ताचे रक्त तुमचे विवेक जिवंत
देवाची सेवा करण्यास निर्जीव कामांपासून किती अधिक
शुद्ध करील.

[१५]आणि म्हणून, तो नव्या कराराचा मध्यस्थ
होण्याचे कारण हे की, आता बोलावले गेलेत त्यांना
पहिल्या कराराच्या उल्लंघनातून मुक्त करणाऱ्या मरणाद्वारे
सार्वकालिक वतनाचे वचन मिळावे. [१६]कारण मृत्युपत्र
असते तेथे मृत्युपत्र करणाऱ्याचा मृत्यू होणेही आवश्यक
असते. [१७]कारण मनुष्य मेल्यानंतर मृत्युपत्र अंमलात येते;

उलट, मृत्युपत्र करणारा जोवर जिवंत आहे तोवर ते काहीच करू शकत नाही. [१८]ह्या कारणामुळे पहिला करारही रक्ताशिवाय स्थापित झाला नाही; [१९]कारण मोशेने सर्व लोकांना नियमशास्त्रानुसार प्रत्येक आज्ञा सांगितल्यावर, त्याने पाण्याबरोबर किरमिजी लोकर व एजोब घेऊन, गोऱ्ह्यांचे व बकऱ्यांचे रक्त घेतले; आणि पुस्तकावर व सर्व लोकांवर शिंपडून [२०]म्हटले की, 'देवाने तुम्हाला नेमून दिलेल्या कराराचे हे रक्त आहे.' [२१]त्याचप्रमाणे त्याने मंडपावर, आणि सेवेच्या सर्व पात्रांवर रक्त शिंपडले.

[२२]नियमशास्त्रानुसार बहुतेक सर्व गोष्टी रक्ताने शुद्ध केल्या जातात, आणि रक्त ओतल्याशिवाय पापांची क्षमा होत नाही.

[२३]**ह्या कारणाने** स्वर्गातील गोष्टींच्या ह्या प्रतिकृती अशा प्रकारे शुद्ध करण्याचे अगत्य होते, तर त्याच स्वर्गीय गोष्टींसाठी ह्यांहून चांगल्या बलिदानांचे अगत्य होते.

[२४]कारण खऱ्याच्या प्रतिकृती म्हणून, हातांनी केलेल्या पवित्र स्थानात ख्रिस्त गेला नाही, पण आपल्यासाठी देवासमोर उभा राहण्यास प्रत्यक्ष स्वर्गात गेला आहे. [२५]आणि श्रेष्ठ याजक प्रत्येक वर्षी दुसऱ्यांचे रक्त घेऊन पवित्र स्थानात प्रवेश करतो, तसे त्याने वारंवार स्वतःचे अर्पण करावे हे त्याला आवश्यक नाही. [२६]कारण तसे होते, तर त्याला जगाच्या स्थापनेपासून अनेकदा सोसणे आवश्यक होते, पण आता, एकदाच, युगाच्या समाप्तीस, तो स्वतःचे बलिदान करून पाप रद्द करण्यास प्रगट झाला.

[२७]पण मनुष्यांसाठी एकदा मरणे व नंतर त्यांचा न्याय होणे हे नेमलेले असल्यामुळे, [२८]पुष्कळांची पापे स्वतःवर घेण्यास ख्रिस्त एकदा अर्पिला गेला; आणि तो दुसऱ्या वेळी पापांसाठी म्हणून नाही, पण तारणासाठी जे त्याची प्रतीक्षा करीत राहतील त्यांना प्रगट होईल.

**१०** कारण येणाऱ्या चांगल्या गोष्टींची नियमशास्त्रात छाया आहे - त्यांचे प्रत्यक्ष प्रतिरूप नाही - असे असल्यामुळे, त्याच्याकडे येणाऱ्यांना ते सतत वर्षानुवर्ष, अर्पीत असलेल्या बलिदानांनी ते कधीच पूर्ण करू शकत नाही. [२]नाहीतर, ती अर्पण करणे थांबले नसते काय? कारण, एकदा जे शुद्ध केले गेलेत अशा उपासकांत पापांचा विवेक पुढे राहू नये. [३]पण त्या बलिदानांत प्रत्येक वर्षी पापांचे स्मरण केले जाते. [४]कारण, बैलांच्या व बकऱ्यांच्या रक्ताने पाप काढून टाकले जाणे अशक्य आहे.

[५]म्हणून जगात येतेवेळी तो असे म्हणतो की,

'बलिदान आणि अर्पण तू इच्छीत नव्हतास,
पण माझ्यासाठी तू शरीर निर्माण केले आहेस.
[६]होमार्पणांत आणि पापांबद्दल केलेल्या अर्पणांत
तुला संतोष वाटला नाही.
[७]तेव्हा मी म्हणालो, देवा, पहा,
पुस्तकाच्या गुंडाळीत
माझ्याविषयी लिहिले आहे.
मी तुझ्या इच्छेप्रमाणे करायला आलो.'

[८]वर जेव्हा त्याने म्हटले की, 'बलिदान व अर्पण, होमार्पणे व पापांबद्दल केलेली अर्पणे तू इच्छीत नाहीस, तुला त्यात संतोष वाटला नाही,' (ही नियमशास्त्रानुसार अर्पिली जातात) [९]तेव्हा तो म्हणाला, 'देवा, पहा, मी तुझ्या इच्छेप्रमाणे करायला आलो'. म्हणजे दुसरे प्रस्थापित करायला तो पहिले रद्द करतो. [१०]आणि त्या इच्छेच्या योगे एकदाच झालेल्या, येशू ख्रिस्ताच्या शरीराच्या अर्पणाने आपण पवित्र केले गेलोत.

[११]**कारण प्रत्येक याजक** दररोज आपली सेवा करीत उभा राहतो; आणि जी बलिदाने कधीच पाप काढून घेऊ शकणार नाहीत तीच तो पुन्हा पुन्हा अर्पण करतो, [१२]पण हा तर पापासाठी, सर्वकाळसाठी एकच बलिदान अर्पण करून देवाच्या उजवीकडे बसला आहे. [१३]आणि पुढील काळात त्याचे वैरी हे त्याचे पदासन केले जाईपर्यंत तो वाट पहात आहे. [१४]कारण ज्यांना तो पवित्र करतो त्यांना त्याने सर्वकाळसाठी एकाच अर्पणाने पूर्ण केले आहे.

[१५]पवित्र आत्माही आपल्याला साक्ष देतो; [१६]परमेश्वर म्हणतो की,

'मी त्या दिवसांनंतर
त्यांच्याबरोबर हा करार करीन.
मी माझे नियम त्यांच्या अंतःकरणांत घालीन,
आणि मी ते त्यांच्या मनांवर लिहीन.'

[१७]आणि हे म्हटल्यावर तो पुढे म्हणतो,

'मी त्यांची पापे आणि त्यांचे अनाचार
कधी स्मरणार नाही.'

१८आणि जेथे ह्यांची क्षमा झाली आहे तेथे पुन्हा पापाबद्दल अर्पण नाही.

१९-२०**म्हणून बंधूंनो,** आपल्याला येशूच्या रक्ताद्वारे, त्याने आपल्यासाठी पवित्र केलेल्या नव्या आणि जिवंत मार्गाने, पडद्यामधून म्हणजे त्याच्या देहाद्वारे, पवित्र स्थानात प्रवेश करण्यास धैर्य आहे. २१आणि आपल्यासाठी देवाच्या मंदिरावर एक थोर याजक आहे; २२म्हणून आपण आपली मने सिंचनाने, वाईट विवेकापासून शुद्ध करून व शरिरे शुद्ध पाण्याने धुऊन, विश्वासाच्या पूर्ण खातरीने खऱ्या मनाने जवळ जाऊ या. २३आपण आपल्या आशेचा पतकर न डगमगता बळकट धरू या. कारण ज्याने वचन दिले तो विश्वासू आहे. २४आणि, आपण प्रीतीत व चांगल्या कामात ईर्ष्येसाठी एकमेकांकडे लक्ष द्यावे. २५काहींची रीत झाली आहे तसे आपण एकत्र जमणे सोडू नये; पण एकमेकांना उत्तेजन द्यावे; आणि, तुम्ही तो दिवस जवळ येत असताना पहात असता हे अधिक करा.

२६कारण आपल्याला सत्याचे ज्ञान मिळाल्यावर, आपण स्वेच्छेने पाप केले, तर पापाबद्दल पुन्हा बलिदान रहात नाही. २७पण न्यायाची, आणि विरोधकांना गिळून टाकणाऱ्या प्रज्वलित ईर्ष्येची एक भयानक प्रतीक्षा मात्र राहते. २८मोशेच्या नियमशास्त्राचा अवमान करणारा कोणीही मनुष्य दोन किंवा तीन साक्षी असल्यास दयेवाचून मरत असे. २९तर मग, देवाच्या पुत्राला ज्याने पायाखाली तुडवले, आणि तो स्वतः ज्यायोगे पवित्र झाला होता ते कराराचे रक्त ज्याने अपवित्र मानले व कृपेच्या आत्म्याचा अवमान केला तो किती अधिक वाईट शिक्षेला पात्र गणला जाईल असे तुम्हाला वाटते? ३०कारण, 'सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन', आणि पुन्हा, 'परमेश्वर आपल्या लोकांचा न्याय करील', असे ज्याने म्हटले आहे त्याला आपण ओळखतो. ३१जिवंत देवाच्या हाती सापडणे ही भयंकर गोष्ट आहे.

३२**पण पूर्वीच्या दिवसांची** आठवण करा; त्या दिवसांत तुम्हाला प्रकाश मिळाल्यावर तुम्ही दुःखांचा मोठा घाला सहन केला. ३३कित्येकदा विटंबना व छळणूक करून तुमचा तमाशा केला गेला; तर कित्येकदा, ज्यांना असे वागविण्यात आले त्यांचे तुम्ही भागीदार झाला. ३४कारण मी बेड्यांत असता माझ्या दुःखांत तुम्ही सहभागी झाला व तुमच्या मालमत्तेची लूट तुम्ही आनंदाने पतकरली. कारण तुम्ही हे जाणता की, तुमच्यासाठी अधिक चांगली मालमत्ता आहे; आणि ती राहणारी आहे.

३५म्हणून आपले धैर्य सोडू नका. त्याचे प्रतिफळ मोठे आहे. ३६कारण तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे केल्यावर तुम्हाला वचन प्राप्त व्हावे म्हणून तुम्हाला धीराची गरज आहे.

> ३७'कारण आता थोडा वेळ राहिला आहे;
> जो येणार आहे तो येईल,
> आणि विलंब लावणार नाही.
> ३८पण नीतिमान विश्वासाने जगेल;
> आणि कोणी माघार घेईल,
> तर माझ्या जिवाला त्याच्याविषयी
> काही संतोष वाटणार नाही.'

३९पण नाशाकडे माघार घेणाऱ्यातले आपण नाही, तर जिवाच्या तारणासाठी जे विश्वास ठेवतात त्यांच्यातले आहोत.

**११** **विश्वास** हा अपेक्षित गोष्टींचा भरवसा व अदृश्य गोष्टींची खातरी असा आहे. २त्यायोगे पूर्वजांनी साक्ष मिळवली. ३विश्वासाने आपल्याला समजते की, देवाच्या शब्दाने युगे निर्माण झाली; म्हणजे ज्या गोष्टी दिसतात त्या दृश्य गोष्टींपासून झाल्या नाहीत.

४**विश्वासाने,** हाबेलाने काइनापेक्षा अधिक चांगले बलिदान देवाला अर्पण केले; त्यायोगे तो नीतिमान होता अशी त्याने साक्ष मिळवली. कारण देवाने त्याच्या अर्पणाविषयी साक्ष दिली. आणि त्यायोगे तो मेला आहे तरी बोलतो.

५विश्वासाने, हनोखाने मरणाचा अनुभव घेऊ नये म्हणून, त्याला लोकान्तरी नेण्यात आले; आणि तो कोठे सापडला नाही. देवाने त्याला लोकान्तरी नेले; कारण त्याला लोकान्तरी नेण्यापूर्वी त्याने अशी साक्ष मिळवली की, तो देवाला संतोषवीत असे. ६पण विश्वासाशिवाय त्याला संतोषविणे अशक्य आहे, कारण जो त्याच्याकडे येतो त्याने विश्वास ठेवला पाहिजे की, तो आहे, आणि जे त्याला झटून शोधतात त्यांना प्रतिफळ देणारा आहे.

७विश्वासाने, नोहाने, पूर्वी कधी न दिसलेल्या गोष्टींविषयी त्याला सूचना मिळाल्याप्रमाणे, आदराने भय

धरून, आपले कुटुंब वाचवण्यासाठी तारू बांधले; आणि त्यायोगे त्याने जगाला दोषी ठरवले आणि विश्वासाने प्राप्त होणाऱ्या नीतिमत्वाचा तो वारीस झाला.

[८]विश्वासाने, अब्राहामाने, त्याला जे ठिकाण वतन मिळणार होते तिकडे जाण्यास त्याला बोलावण्यात आले तेव्हा आज्ञा मानली. तो कोठे जाणार होता हे त्याला माहीत नसताना तो निघाला. [९]विश्वासाने, तो वचनाच्या देशात, जणू परदेशात प्रवासी म्हणून राहिला; आणि त्याच वचनात त्याचे जोडीचे वारीस इसहाक व याकोब ह्यांच्याबरोबर तो डेऱ्यांत राहिला. [१०]कारण, ज्या नगराला पाये आहेत, ज्याचा कारागीर व बांधणारा देव आहे अशा नगराची ते प्रतीक्षा करीत होते.

[११]विश्वासाने, सारेलाही, ती स्वतः वयातीत झाली असता प्रजोत्पादनशक्ती मिळाली; कारण ज्याने वचन दिले त्याला तिने विश्वासू मानले. [१२]म्हणून केवळ एकापासून, आणि अशा मृतवत् झालेल्या एकापासून ते संख्येने आकाशातील ताऱ्यांप्रमाणे, समुद्राच्या किनाऱ्यावरील वाळूप्रमाणे असंख्य झाले.

[१३]हे सगळे विश्वासात मेले; त्यांना वचनांची प्राप्ती झाली नव्हती पण त्यांनी ती दुरून बघून त्यांना वंदन केले आणि त्यांनी मानले की, आपण पृथ्वीवर परके आणि प्रवासी आहोत. [१४]कारण, असे जे म्हणतात ते स्वतःचा देश मिळवू पहात आहेत हे ते दाखवतात. [१५]आणि खरोखर, ते ज्या देशातून निघाले होते त्याचा ते विचार करीत असते, तर तिकडे परत जाण्याची संधी त्यांना मिळाली असती. [१६]पण आता, ते अधिक चांगल्या म्हणजे स्वर्गीय देशाची इच्छा धरतात, कारण त्याने त्यांच्यासाठी एक नगर तयार केले आहे.

[१७]विश्वासाने, अब्राहामाने, त्याची परीक्षा केली जात असता इसहाकाला अर्पण केले; म्हणजे, ज्याने वचने स्वीकारली होती त्याने आपल्या एकुलत्या एकाला अर्पण केले. [१८]त्याच्याविषयी हे म्हटले होते की, 'इसहाकाद्वारे तुझे संतान बोलावले जाईल'. [१९]तरी, देव त्याला मेलेल्यांतून उठवायलादेखील समर्थ आहे असे त्याने मानले. तो त्याला तेथून, जणू उपमेने, परतही मिळाला.

[२०]विश्वासाने, इसहाकाने, याकोबाला व एसावाला येणाऱ्या गोष्टींविषयी आशीर्वाद दिला. [२१]विश्वासाने, याकोबाने मरतेवेळी योसेफाच्या प्रत्येक मुलाला आशीर्वाद दिला व आपल्या काठीच्या टोकावर टेकून नमन केले. [२२]विश्वासाने, योसेफाने, मरतेवेळी, इस्राएलाच्या वंशजांच्या निर्गमनांचा उल्लेख केला व आपल्या अस्थींविषयी आज्ञा दिली.

[२३]विश्वासाने, मोशे जन्मल्यावर, त्याला त्याच्या आईबापांनी तीन महिने लपवून ठेवले; कारण मूल सुंदर आहे हे त्यांनी बघितले व राजाचे भय धरले नाही. [२४]मोशेने, विश्वासाने, तो मोठा झाल्यावर फारोच्या कन्येचा मुलगा म्हणवणे नाकबूल केले. [२५]पापांची तात्कालिक सुखे भोगण्यापेक्षा देवाच्या लोकांबरोबर दुःख सोसणे त्याने पसंत केले, [२६]आणि ख्रिस्ताचे दूषण हे मिसरातील भांडारापेक्षा मोठे धन मानले; कारण तो प्रतिफळाकडे अचल दृष्टीने पहात होता.

[२७]विश्वासाने, त्याने मिसर देश सोडला, राजाच्या क्रोधाला भिऊन नाही; कारण जो अदृश्य आहे त्याला पहात असल्याप्रमाणे तो ठाम राहिला. [२८]विश्वासाने, त्याने वल्हांडण व रक्तसिंचन हे विधी पाळले, ते ह्यासाठी की, प्रथम जन्मलेल्यांना मारणाऱ्याने त्यांना शिवू नये.

[२९]विश्वासाने, ते तांबड्या समुद्रामधून, कोरड्या जमिनीवरून गेल्याप्रमाणे गेले व मिसरी तसे करण्याच्या प्रयत्नात बुडवले गेले. [३०]विश्वासाने, त्यांनी सात दिवस, यरिहोच्या तटासभोवती फेरे घातल्यावर ते तट पडले.

[३१]विश्वासाने, राहाब वेश्या ही अवमान करणाऱ्या इतरांबरोबर नाश पावली नाही; कारण, तिने शांतीने हेरांचे स्वागत केले होते.

[३२]आता मी अधिक काय सांगू? गिदोन, बाराक, शमशोन आणि इफताह, तसेच दावीद व शमुवेल आणि संदेष्टे ह्यांच्याविषयी मी सांगू लागलो तर मला काळ अपुरा पडेल. [३३]विश्वासाने त्यांनी राज्ये जिंकली, नीती आचरली, वचने मिळवली, सिंहांची तोंडे बंद केली. [३४]त्यांनी अग्नीचे बळ शमविले, तरवारीच्या धारेपासून ते निभावले, अशक्तपणात सशक्त झाले, युद्धात पराक्रमी झाले, त्यांनी परक्यांची सैन्ये पळवली. [३५]कित्येक स्त्रियांना त्यांचे मेलेले, पुन्हा जिवंत होऊन, परत मिळाले. आणि कित्येकांनी अधिक चांगले पुनरुत्थान मिळवण्यास आपली सुटका न पतकरल्यामुळे त्यांचे हाल हाल करण्यात आले. [३६]आणखी दुसऱ्यांनी टवाळक्यांचा व तसाच फटक्यांचा, शिवाय बेड्यांचा व बंदिवासाचा अनुभव घेतला. [३७]त्यांना दगडमार केला गेला, त्यांना करवतीने कापले, त्यांची परीक्षा केली गेली, ते तरवारीने मारले गेले आणि दुरावलेले, नाडलेले व पीडलेले होऊन ते मेंढरांची व शेरड्यांची कातडी पांघरून भटकले. [३८](जग

त्यांच्यासाठी लायक नव्हते) ते रानांमधून, डोंगरांमधून,
गुहांमधून व जमिनीमधील खंदकांमधून फिरत राहिले.
[३९]ह्या सर्वांनी विश्वासाद्वारे साक्ष मिळवली असे
असता त्यांना वचन प्राप्त झाले नाही. [४०]कारण ते
आपल्याशिवाय पूर्ण केले जाऊ नयेत अशी देवाच्या
दृष्टीपुढे आपल्यासाठी अधिक चांगली गोष्ट होती.

# १२

म्हणून जर आपल्यासभोवती साक्षींचा
इतका मोठा मेघ आहे, तर आपणदेखील
प्रत्येक ओझे व आपल्याला सहज गुंतविणारे पाप काढून
टाकून, आपल्यापुढे ठेवलेली धाव धीराने धावू या.
[२]आपल्या विश्वासाचा मार्ग काढणाऱ्या व पूर्ण करणाऱ्या
येशूकडे अचल दृष्टीने पहात राहून आपण धावू या.
त्याच्यापुढे ठेवल्या गेलेल्या आनंदासाठी त्याने लज्जा
तुच्छ मानून, वधस्तंभ सहन केला आणि तो आता,
देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला आहे. [३]आणि
तुम्ही थकू नये व आपल्या मनांत खचू नये म्हणून असा
पाप्यांचा विरोध ज्याने स्वतः सहन केला त्याच्याकडे लक्ष
द्या.
[४]तुम्ही पापाविरुद्ध लढण्यात अद्याप रक्तापर्यंत
विरोध केलेला नाही. [५]पण तुम्हाला पुत्र म्हणणारा हा बोध
तुम्ही विसरलात काय?

'माझ्या मुला,
तू परमेश्वराची शिस्त अवमानू नकोस,
आणि तो तुला दोष लावील तेव्हा खचू नकोस.
[६]कारण परमेश्वर ज्याच्यावर प्रीती करतो
त्याला तो शिस्त लावतो,
आणि तो ज्याला जवळ घेतो
त्या प्रत्येक मुलाला फटके मारतो.'

[७]तुम्ही जर शिस्त सहन केली आहे तर देव तुम्हाला
पुत्रांप्रमाणे वागवीत आहे; कारण बाप ज्याला शिस्त
लावीत नाही असा पुत्र कोण आहे? [८]पण सगळे जण जिचे
वाटेकरी होतात त्या शिस्तीबाहेर तुम्ही असाल तर तुम्ही
दासीपुत्र आहा आणि पुत्र नाही. [९]शिवाय आपल्याला
शिस्त लावणारे आपल्या देहाचे बाप होते, आणि आपण
त्यांना मान दिला; तर जो आत्म्यांचा पिता आहे त्याला
अधिक आज्ञांकित होऊन आपण जगू नये काय?
[१०]त्यांना योग्य वाटल्याप्रमाणे त्यांनी थोडे दिवस
आपल्याला शिस्त लावली; पण तो आपल्याला
हितकारक होईल अशी शिस्त लावतो, म्हणजे आपण
त्याच्या पावित्र्यात वाटेकरी व्हावे. [११]आता, कोणतीही
शिस्त तेव्हाच्या वेळी आनंदाची वाटत नाही, पण
दुःखाची वाटते; पण ज्यांना तिचे वळण लागते त्यांना पुढे
ती नीतिमत्वाचे शांतिमय फळ देते. [१२]म्हणून तुम्ही
लोंबकळणारे हात व लटपटणारे गुडघे ताठ करा. [१३]आणि
तुमच्या पायांखाली तुम्ही सरळ वाटा करा; म्हणजे लंगडा
पाय मुरगळू नये, तर तो उलट बरा व्हावा.
[१४]सर्वांबरोबर शांतीच्या व पावित्र्याच्या मागे लागा;
त्याशिवाय कोणी मनुष्य परमेश्वराला पाहणार नाही.
[१५]आणि लक्ष ठेवा; नाहीतर कोणी मनुष्य देवाच्या कृपेला
उणा पडेल; नाहीतर, एखादे कडूपणाचे मूळ उगवून ते
तुम्हाला अस्वस्थ करील व त्यामुळे पुष्कळ जण दूषित
होतील. [१६]नाहीतर, तुमच्यात कोणी जारकर्मी, किंवा
एसावासारखा भ्रष्ट होईल; त्याने एका जेवणासाठी आपले
ज्येष्ठपण विकले. [१७]कारण तुम्ही जाणता की, त्यानंतर
आपला आशीर्वादाचा वारसा मिळवायची त्याची इच्छा
असता, जरी त्याने अश्रू गाळीत तो मिळविण्याचा प्रयत्न
केला तरी तो नाकारण्यात आला, कारण तेव्हा त्याला
पश्चात्ताप करण्यास वाव मिळाला नाही.
[१८]कारण ज्याला कोणीही शिवेल, अशा अग्नीने
जळणाऱ्या डोंगराकडे तुम्ही आला नाही, धुक्याकडे व
अंधाराकडे नाही, वावटळीकडे नाही, [१९]कर्णा
वाजण्याच्या आवाजाकडे व शब्दांच्या आवाजाकडे
आला नाही. तेव्हा तो ऐकणाऱ्यांनी अशी विनवणी केली
होती की, आमच्याशी त्या शब्दाद्वारे अधिक बोलले जाऊ
नये; [२०]कारण 'त्या डोंगराला एक पशू जरी शिवला तरी
त्याला दगडमार करावा', अशी जी आज्ञा दिली गेली होती
ती त्यांना सहन करता येईना. [२१]ते दृश्य इतके भयानक
होते की, मोशे म्हणाला, 'मी अतिशय भीत आहे आणि
कापत आहे.'
[२२]पण तुम्ही सियोन डोंगराकडे, आणि जिवंत
देवाच्या नगरात म्हणजे स्वर्गीय यरुशलेमात, अगणित
देवदूतांच्या उत्सवात, [२३]स्वर्गात ज्यांची नोंद आहे अशा
ज्येष्ठांच्या मंडळीत, सर्वांवर न्यायाधीश असलेल्या
देवाकडे, पूर्ण केलेल्या नीतिमानांच्या आत्म्यांकडे,
[२४]आणि नव्या कराराचा मध्यस्थ झालेल्या येशूपुढे व
शिंपडण्याच्या रक्ताजवळ आला आहा; ते हाबेलाच्या
रक्तापेक्षा अधिक चांगल्या गोष्टी बोलत आहे.

[२५]**पहा, जो बोलत आहे** त्याला तुम्ही नाकारू नका;
कारण पृथ्वीवर सूचना देणाऱ्याला नाकारणारे निभावले
नाहीत, तर जो स्वर्गातून सूचना देत आहे त्याच्यापासून
आपण फिरलो तर किती विशेषेकरून निभावणार नाही!
[२६]तेव्हा त्याच्या आवाजाने पृथ्वी हादरली, पण आता
त्याने वचन देऊन म्हटले आहे की, 'मी अजून आणखी
एकदा, केवळ पृथ्वी नाही, पण आकाशही हालवीन'.
[२७]'अजून आणखी एकदा' ह्या म्हणण्याने निर्माण
केलेल्या गोष्टींप्रमाणे हालविल्या जातील अशा गोष्टी
काढून टाकणे, हा अर्थ उघड होतो. म्हणजे न हालणाऱ्या
गोष्टी रहाव्यात. [२८]तरी पण जे हालविले जाणार नाही असे
राज्य आपण घेत आहोत; म्हणून आपण उपकार मानून
देवाला संतोष होईल अशा प्रकारे, आनंदाने व भय धरून
त्याची सेवा करीत राहू या. [२९]कारण आपला देव हा संहार
करणारा अग्नी आहे.

**१३** **बंधुप्रेम तुमच्यात राहो.** [२]आतिथ्यप्रेम
विसरू नका; कारण त्यामुळे कित्येकांनी
नकळत देवदूतांचे आतिथ्य केले आहे. [३]जे बंधनात
आहेत त्यांच्याबरोबर तुम्हीही बंदीत असल्याप्रमाणे
त्यांची आठवण करा; तशीच पीडितांची आठवण करा,
कारण स्वतः तुम्ही शरिरात आहा.

[४]**सर्वांत लग्न आदरणीय,** आणि अंथरूण अदूषित
राहो. पण जे कोणी जारकर्मी किंवा व्यभिचारी आहेत
त्यांचा देव न्याय करील.

[५]**तुमची वागणूक निर्लोभ ठेवा,** तुम्हाला मिळाले
आहे तेवढ्यात संतुष्ट रहा; कारण त्याचे म्हणणे आहे, 'मी
तुला कधी टाकणार नाही किंवा सोडणार नाही'. [६]म्हणून
आपण धीट होऊन म्हणावे की,

> 'परमेश्वर माझा साहाय्यक आहे;
> मी भिणार नाही.
> मला मनुष्य काय करू शकेल?'

[७]**तुम्हाला देवाचे वचन** सांगणाऱ्या तुमच्या नेत्यांची
आठवण करा; त्यांच्या आचरणाचा परिणाम पाहून
त्यांच्या विश्वासाचे अनुकरण करा. [८]येशू ख्रिस्त हा
काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे.

[९]**नाना प्रकारच्या** नव्या शिकवणींनी वाहवून नेले जाऊ
नका; कारण खाण्याच्या प्रकारांपेक्षा कृपेने अंतःकरण
सुस्थिर व्हावे हे अधिक चांगले; अशा गोष्टींत जे जातात
त्यांना त्यांकडून लाभ झालेला नाही. [१०]आपल्याला अशी
वेदी आहे की, मंडपाची सेवा करणाऱ्यांना तीवरील
खाण्याचा अधिकार नाही.
[११]कारण, पापांबद्दल अर्पण करण्यास श्रेष्ठ याजक
पवित्र स्थानात ज्या प्राण्यांचे रक्त नेतो, त्यांची शरिरे
तळाबाहेर जाळली जातात. [१२]तसेच येशूने आपल्या
रक्ताने लोकांना पवित्र करण्यासाठी वेशीबाहेर मरण
सोसले. [१३]म्हणून आपण त्याचा अपमान सहन करून
तळाबाहेर त्याच्याकडे जाऊ या. [१४]कारण आपल्याला
येथे राहणारे नगर नाही, पण आपण येणारे मिळवू पहात
आहोत. [१५]म्हणून त्याचे नाव पतकरणाऱ्या ओठांचे फळ,
म्हणजे स्तुतीचा यज्ञ आपण देवाला, त्याच्या द्वारे, नित्य
अर्पण करू या. [१६]पण चांगले करणे व भागी देणे विसरू
नका. कारण अशा यज्ञांनी देव संतुष्ट होतो.
[१७]तुम्ही आपल्या नेत्यांचे ऐका व स्वतः आज्ञाधारक
व्हा. कारण त्यांना हिशोब देणे असल्याप्रमाणे ते तुमच्या
जिवांसाठी जागृत राहतात; म्हणजे त्यांना ते आनंदाने
करता यावे, दुःखाने नव्हे, कारण ते तुमच्या अहिताचे
होईल.

[१८]**आमच्यासाठी प्रार्थना करा;** कारण आमची
खातरी आहे की, आमचा विवेक चांगला आहे, कारण
सर्व गोष्टींत चांगले वागण्याची आमची इच्छा आहे. [१९]पण
मला तुमच्याकडे लवकर परत येता यावे म्हणून अधिक
करा अशी विनंती करतो.

[२०]**आता तो शांतीचा देव,** ज्याने सार्वकालिक
कराराच्या रक्ताने, मेंढरांचा जो महान मेंढपाळ, आपला
प्रभू येशू ह्याला मेलेल्यांमधून आणले, [२१]त्याच्या दृष्टीस
जे संतोषदायक ते तो तुमच्यात येशू ख्रिस्ताच्या द्वारे करो,
आणि प्रत्येक चांगल्या कामात त्याच्या इच्छेप्रमाणे
करण्यास तो तुम्हाला परिपूर्ण करो. त्याला युगानुयुग गौरव
असो. आमेन.

[२२]**आता बंधूंनो,** मी विनंती करतो की, तुम्ही एवढे
बोधाचे बोलणे सहन करा; कारण मी तुम्हाला थोडक्या
शब्दांत पत्र लिहिले आहे.

[२३]तुम्हाला हे विदित व्हावे की, आपला बंधू तिमथ्य सुटला आहे. तो लवकर आला, तर मीपण त्याच्याबरोबर तुम्हाला भेटेन.

[२४]तुमच्यावरील अधिकाऱ्यांना आणि सर्व पवित्र जनांना सलाम द्या.

इटलीकर तुम्हाला सलाम सांगतात.

[२५]तुम्हा सर्वांबरोबर कृपा असो.